ePaper

# शरद पवार राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेत सहभागी होणार



|वर्ष - 6 |अंक - 203 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**


- ‘२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपा अधिक जागांवर निवडून येईल’- चंद्रकांत पाटील
- महापालिका मुख्य अग्निशामक अधिकारी पदावर शासनाचा अधिकारी येणार
- सुवर्णमध्य कसा साधेल?


www.mahaenews.com | रविवार |दिनांक 6नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# अस्वच्छता दूतांना दणका!

## प्रशासनाची कारवाई : नऊ महिन्यांत सव्वा कोटींची वसुली

**|पिंपरी-चिंचवड |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**रस्त्यावर घाण करणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, उघड्यावर शौच करणे, रस्त्यावर राडारोडा टाकणे, बायोमेडिकल वेस्ट उघड्यावर टाकणे, कचरा जाळणे, पाळीव प्राण्यांव्दारे अस्वच्छता करणा-यांवर महापालिकेकडून दंडात्मक कारवाई केली जाते. त्याकरिता आठही क्षेत्रीय कार्यालयांसाठी ग्रीन मार्शल पथकांची नेमणूक करण्यात आली असून या पथकांच्यामार्फत महापालिकेला अवघ्या नऊ महिन्यांत तब्बल सव्वा कोटी रूपये मिळाले आहेत.**



औद्योगिकनगरी, कामगारनगरीकडून स्मार्ट सिटी ते मेट्रो सिटीकडे शहराची वाटचाल होत असताना शहराची लोकसंख्याही झपाट्याने वाढत आहे. शहरातील अनेक नागरिक स्वच्छतेचे नियम मोडत असल्याने पालिकेने दंडात्मक कारवाईचा बडगा हाती घेतला आहे. दंडात्मक कारवाईसाठी महापालिकेच्या वतीने आठही क्षेत्रीय कार्यालयांसाठी प्रत्येकी एक ग्रीन मार्शल पथकांची नेमणूक करण्यात आली आहे.

या पथकांमार्फत गेल्या नऊ महिन्यात रस्त्यावर घाण करणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, उघड्यावर शौच करणे, रस्त्यावर राडारोड टाकणे, बायोमेडिकल वेस्ट उघड्यावर टाकणे,(PCMC NEWS) कचरा जाळणे, पाळीव प्राण्यांव्दारे अस्वच्छता करणे यासह विविध नियम मोडणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. या कारवाईतून महापालिकेला तब्बल सव्वा कोटी रूपये मिळाले आहेत.

### नागरिकांनी नियमांचे पालन करावे...

आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे म्हणाले, ”नियम मोडणाऱ्या नागरिकांवर कारवाई करण्यासाठी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात एका ग्रीन मार्शल पथकाची नेमणूक करण्यात आली आहे.

या पथकांमार्फत नियम मोडणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.

गेल्या नऊ महिन्यांत या पथकाने सव्वा कोटी रूपयांचा दंड वसूल केला आहे. शहर स्वच्छ रहावे, यासाठी नागरिकांनी नियमांचे पालन करणे आवश्यक आहे”.

# प्रकल्प पूर्णत्वासाठी कामाला लागा !

## शंकर जगताप यांच्या सूचना : अधिकाऱ्यांच्या बैठकीत लक्ष वेधले

**| पिंपरी |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप यांनी पिंपळेगुरव आणि नवी सांगवी भागातील अर्धवट आणि विविध प्रलंबित विकासकामांचा शुक्रवारी (दि. ११) आढावा घेतला. यासंदर्भात पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून विकासकामांना गती देण्याची मागणी केली. स्मार्ट सिटीअंतर्गत सुरू असलेली काही कामेही अर्धवट स्थितीत असल्याचेही शंकर जगताप यांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले.**



नगरसेवकांच्या कार्यकाळात पिंपळेगुरव आणि नवी सांगवीतील अनेक विकासकामांना सुरूवात करण्यात आली होती.

परंतु, महापालिकेवर प्रशासक राज सुरू झाल्यानंतर या विकासकामांना थोडा ब्रेक लावण्यात आला आहे. बहुतांश कामे संथगतीने सुरू आहेत. त्यामुळे या भागातील नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

विकासकामांना गती मिळावी या उद्देशाने भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप यांनी स्थायी समितीचे माजी सभापती राजेंद्र राजापुरे, माजी नगरसेवक सागर आंघोळकर, अंबरनाथ कांबळे यांच्या उपस्थितीत महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून पिंपळेगुरव आणि नवी सांगवीतील सर्व कामांचा आढावा घेतला. अर्धवट स्थितीतील कामांबाबत महापालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली.

यावेळी महापालिकेचे सहशहर अभियंता मनोज सेठिया, कार्यकारी अभियंता अनिल शिंदे, उपअभियंता विजय कांबळे, राहुल पाटील, चंद्रकांत मोरे आदी उपस्थित होते.

> नवी सांगवीतील कृष्णा चौकाचे सुशोभिकरण, कृष्णा चौक ते एम. के. हॉटेलपर्यंत सांडपाणी वाहिन्यांचे काम, सांगवी फाटा ते सांगवी हा १२ मीटर रुंदीचा रस्ता पूर्ण करण्याची मागणी केली. तसेच पिंपळेगुरवमधील सुदर्शननगर चौकातील ८ टू ८० पार्कमधील खेळणी आणि व्यायामाचे साहित्य तुटल्याचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. त्याचप्रमाणे स्मार्ट सिटीअंतर्गत पिंपळेगुरवमध्ये सुरू असलेली काही कामे अर्धवट स्थितीत असल्याचेही अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे.
>
> **- शंकर जगताप,** निवडणूक प्रभारी, चिंचवड विधानसभा, भाजपा.

## ‘2024 च्या लोकसभा निवडणुकीत

# भाजपा अधिक जागांवर निवडून येईल’ - चंद्रकांत पाटील

।पुणे ।महाईन्यूज।

पंतप्रधान नरेंद्र मोदींचा प्रचार करण्याची गरज नाही. त्यांनी सर्वसामान्य नागरिकांचं भल केलं आहे. त्यामुळे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपा ४०० पेक्षा अधिक जागांवर निवडून येईल, असा विश्वास पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला आहे. ते पिंपरी-चिंचवडमध्ये एका खासगी महाविद्यालयाच्या कार्यक्रमात बोलत होते. सध्या महाविकास आघाडीच्या नेत्यांची स्थिती ही खोटं बोल पण रेटून बोल अशी झाली असल्याचे



म्हणत पाटील यांनी टीका केली आहे. चंद्रकांत पाटील म्हणाले की, वेदांत फॉक्सकॉन विषयी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट मांडणी केली आहे. पण, महाविकास आघाडीचे नेते तेच तेच बोलून जनतेवर बिंबवण्याचा प्रयत्न करत आहेत. जनतेत संभ्रम निर्माण करत आहेत. शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांची जळगाव येथील आणि आदित्य ठाकरे यांची सिल्लोड येथील सभा रद्द झाल्याने शिंदे- फडणवीस सरकार सत्तेचा दुरुपयोग करत असल्याचा आरोप महाविकास आघाडीचे नेते करत आहेत. याला प्रतिउत्तर देत पाटील म्हणाले की, महाविकास आघाडी सरकारने अडीच वर्षे सत्तेचा गैरवापर केला. त्याची यादी काढली तर दिवस पुरणार नाही. सोशल मिडियावर रियाक्ट झालं तरी पोलीस ठाण्यात घेऊन जायचे. घरात घुसून मारत होते हे ते विसरले आहेत का? त्यांनी सत्तेचा अडीच वर्षे दुरुपयोग केला आहे. असे प्रत्युत्तर पाटील यांनी दिले आहे.

---

# पीएम किसान योजनेंतर्गत अपात्र लाभार्थ्यांकडून वसुली करण्यात अपयश

## प्राप्तिकर भरणाऱ्या शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा घेतला

।पुणे। महाईन्यूज ।

प्राप्तिकर भरणाऱ्या शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ घेतला आहे. संबंधित लाभार्थ्यांना अपात्र ठरविण्यात आले असून त्यांच्याकडून या योजनेच्या लाभाची रक्कम वसूल करण्यात येत आहे. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून केवळ ५० टक्केच रक्कम वसूल करण्यात जिल्हा प्रशासनाला यश मिळाले आहे. अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी मोदी सरकारकडून प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत वर्षाला सहा हजार देण्यात येतात. या योजनेचा लाभ घेण्यासाठी नियमानुसार प्राप्तिकर भरणारे, केंद्र किंवा राज्य सरकारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेतील अधिकारी, कर्मचारी, सनदी लेखपाल आदी व्यक्ती या योजनेसाठी पात्र ठरू शकत नाहीत. कर्नाटक राज्यात या योजनेंतर्गत निकषात न बसणाऱ्यांनी योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले. या पार्श्वभूमीवर केंद्राकडून या योजनेसाठी लाभार्थ्यांना ओळख पडताळणी प्रक्रिया (केवायसी) आणि आधार प्रमाणीकरण करण्याचे आदेश देण्यात आले. नवीन आदेशाची अंमलबजावणी करताना जिल्ह्यातही अनेक अपात्र व्यक्तींनी या योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले. तोपर्यंत लाभधारकांना तिसऱ्या टप्प्याचा निधी म्हणजे वार्षिक एकूण सहा हजार रुपये खात्यावर वर्ग झाले होते. जिल्ह्यात




अशा अपात्र व्यक्तींना १४ कोटी सहा लाख २८ हजार रुपये वितरीत झाले आहेत. हा निधी संबंधित व्यक्तींकडून पुन्हा वसूल करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

दरम्यान, मार्च २०१९ मध्ये साडेपाच कोटी रुपयांची वसुली करण्यात आली. मात्र, त्यानंतर करोनामुळे ही वसुली थांबली होती. आतापर्यंत सहा कोटी ५८ लाख १६ हजार रुपये वसूल करण्यात आले आहेत. अजून सात कोटी ४८ लाख १२ हजार रुपयांची वसुली बाकी असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले.

इंदापूर ८८,५६,००० (७१.१४), बारामती २,१४,८६,००० (६४.६१), दौंड १,५२,५६,००० (६२.७२), भोर ५५,०६,००० (६०.८४),

हवेली ६४,१२,००० (५७.७७), पुरंदर १,०९,८०,००० (५६.२८), शिरूर १,६४,४०,००० (५१.६९), जुन्नर १,७५,९८,००० (५०.९६), आंबेगाव १,०४,६२,००० (४९.८४), खेड १,३०,५२,००० (४०.१०), मुळशी ७२,३४,००० (२९.३९), वेल्हा २३,४८,००० (२५.८१), मावळ ४९,९८,००० (२३.६५) असे एकूण १४ कोटी सहा लाख २८ हजार रुपयांचा लाभ अपात्र व्यक्तींना देण्यात आला असून वसुली ५३.२० टक्के एवढीच करण्यात आलेली आहे.

### बारामती प्रथम क्रमांकावर

प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेंतर्गत निकषात न बसणाऱ्या आणि योजनेचा फायदा घेणाऱ्यांमध्ये बारामती तालुका प्रथम क्रमांकावर आहे. या तालुक्यातील व्यक्तींनी दोन कोटी १४ लाख ८६ हजार रुपयांचा लाभ घेतला आहे. त्यापैकी ७६ लाख चार हजार रुपये वसूल करण्यात आले आहेत. उर्वरित वसुली अद्याप बाकी आहे. दुसऱ्या क्रमांकावर जुन्नर तालुका असून या ठिकाणी एक कोटी ७५ लाख ९८ हजार रुपयांचा निधी निकषात न बसणाऱ्या व्यक्तींच्या खात्यात जमा करण्यात आला आहे. त्यापैकी ८६ लाख ३० हजार रुपये वसूल करण्यात आले आहेत.

---

# ग्रामपंचायत हिंजवडी ग्रामसचिवालय इमारत तसेच श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा अनावरण सोहळ्याचे आयोजन!

## मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत अनावरण सोहळा, भव्य मिरवणूक सोहळ्याचे आयोजन

।पुणे । महाईन्यूज ।

**ग्रामपंचायत हिंजवडी ता. मुळशी जि. पुणे येथील हिंजवडी ग्रामसचिवालय इमारत व श्री. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचे अनावरण सोहळ्याचे आयोजन रविवारी 6 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 6 वाजता करण्यात आले आहे. सायंकाळी 4 वाजता भव्य मिरवणूक हे या सोहळ्याचे विशेष आकर्षण असणार आहे, अशी माहिती माजी सरपंच विशाल साखरे यांनी दिली.**

राज्यसभेचे खासदार छत्रपती उदयनराजे भोसले तसेच छत्रपती संभाजीराजे भोसले यांच्या हस्ते अनावरण सोहळा होणार आहे. खासदार सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. तर आमदार संग्राम थोपटे व संजय भेगडे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तर या सोहळ्याचे गणराज वाद्यपथक, शिवकालीन वाद्यपथक, मर्दानी खेळ, छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा, वारकरी दिंडी, 18 पगड जाती, छत्रपती शिवाजी महाराजांची पालखी, फुलांची आरास, पेपर ब्लास्ट आदींचे मुख्य आकर्षण असणार आहे.

तसेच मान्यवरांचे स्वागत, मनोगत, सह्याद्रीचा सिंहगर्जना, गायक अवधुत गांधी त्यानंतर आभार प्रदर्शन असे विविध कार्यक्रम पार पडणार आहेत. परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन हिंजवडी ग्रामपंचायतीचे सरपंच मच्छिंद्र हुलावळे, उपसरपंच पल्लवी गंगावणे यांनी केले आहे.



# मुख्य अग्निशामक अधिकारी पदावर शासनाचा अधिकारी येणार!

## किरण गावडे सेवानिवृत्त : मुख्य अग्निशामक अधिकारी पदासाठी महापालिकेत पात्र अधिकारीच नाही

**पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेचे मुख्य अग्निशामक अधिकारी किरण गावडे सेवानिवृत्त झाले असून त्यांच्यानंतर यापदासाठी महापालिकेत पात्र अधिकारीच नाही. त्यामुळे महापालिका प्रशासनाने राज्य शासनाकडे मुख्य अग्निशामक अधिकारी देण्याची मागणी केली आहे. त्यामुळे या पदावर आता शासनाचा अधिकारी येणार आहे.**



मुख्य अग्निशामक अधिकारी किरण गावडे हे नियत वयोमानानुसार 31 ऑक्टोबर 2022 रोजी पालिका सेवेतून निवृत्त झाले. त्यांच्या निवृत्तीनंतर तत्काळ दुस-या अधिका-याकडे हे पद देणे अपेक्षित होते. परंतु, अग्निशामक विभागाकडे या पदासाठी एकही पात्र अधिकारी नसल्याचे समोर आले. मुख्य अग्निशामक अधिकारी या पदावर उप अग्निशामक अधिकाऱ्याला बढती मिळू शकते. मात्र, महापालिकेच्या अग्निशामक विभागाकडे गेल्या कित्येक वर्षांपासून उप अग्निशामक अधिकारी हे पद देखील रिक्त आहे. पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या 27 लाखांवर पोहोचली आहे. वाढत्या शहराबरोबर विविध भागात आगीच्या, आपत्तीच्या घटनाही वेळोवेळी घडत असतात. विविध इमारतींचे बांधकाम, रूग्णालयांसाठी अग्निशामक विभागाचा ना-हरकत (एनओसी) दाखला देणे अत्यंत महत्वाचा असतो. हा दाखला मुख्य अग्निशामक अधिकारीच त्यांच्या स्वाक्षरीने देतात.

परंतु, अधिकारीच नसल्याने हे काम खोळंबले आहे. मुख्य अग्निशामक अधिकारी गावडे हे सेवानिवृत्त होणार असून त्यांच्या जागी पात्र व्यक्ती नाही, याची प्रशासनाला पूर्व कल्पना होती. मात्र, त्यानंतरही प्रशासनाने अद्याप कोणतीही तजवीज केली नाही. मुख्य अग्निशामक अधिकारी या पदासाठी विभागीय अग्निशामक अधिकारी हा कोर्स उत्तीर्ण असणे गरजेचे आहे.

पदवीधर आणि उप अग्निशामक अधिकारी पदावर काम केल्याचा अनुभव असणे बंधनकारक आहे. मात्र, या पदासाठी अग्निशामक विभागाकडे सध्या तरी एकही अधिकारी नाही. त्यामुळे हे पद रिक्त ठेवण्याची नामुष्की प्रशासनावर आली आहे.

### आकृतीबंधात हे पद शासनाकडील अधिका-यासाठीच....

**मुख्य अग्निशामक अधिकारी व उप अग्निशामक अधिकारी ही दोन्ही पदे भरण्यासाठी महापालिकेने दोन महिन्यापूर्वी जाहिरात प्रसिध्द केली होती. यासाठी अर्जही आले आहेत. या पदासाठी लवकरच परिक्षा घेण्यात येणार आहे. मुख्य अग्निशामक अधिकारी देण्यासाठी शासनाकडे मागणी केली जाणार आहे. आकृतीबंधात हे पद शासनाकडील अधिका-यासाठीच आहे, असे प्रशासनाने सांगितले.**

---

# समरसतापूर्ण व्यववहारातून भारत विश्वगुरू

## सुनील देवधर : कलारंग संस्थेतर्फे "भविष्यातील भारत" या विषयावर व्याख्यान

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**भारत देश बदलत आहे. पुढे जात आहे. "एक भारत, श्रेष्ठ भारत" ख-या अर्थाने प्रत्यक्षात घडत आहे. गरिबी संपली, समस्या संपल्या असे म्हणणे मुळीच नाही. परंतु, समस्या संपविण्याकडे घेऊन जाण्यासाठीचा रस्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखवला आहे. आपला भारत देश विश्वगुरू बनवायचा आहे. त्यामुळे आपण नामानिराळे राहून चालणार नाही. त्यासाठी समरसतापूर्ण व्यवहार महत्त्वाचा असून जाती-पाती उखडून फेकल्या पाहिजेत. तरच आपण विश्वगुरू होणार आहोत, असा मोलाचा संदेश भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय सचिव सुनील देवधर यांनी चिंचवड येथे आयोजित स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात दिला.**



कलारंग संस्थेचे २५ वर्षात पदार्पण केले, या निमित्त चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात पिंपरी चिंचवड यांच्या वतीने शुक्रवार दि. ४ नोव्हेंबर २०२२ रोजी आयोजित कार्यक्रमात "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व भविष्यातील भारत" या विषयावर ते बोलत होते. या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर पद्मश्री गिरीश प्रभुणे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी विनोद बन्संल, मुकुंद कुलकर्णी, हेमंत हरहरे, मिलिंद देशपांडे, विनायक थोरात, माहेश्वर मराठे, माजी खासदार अमर साबळे, आमदार उमा खापरे, माजी महापौर माई ढोरे, शंकर जगताप, एकनाथ पवार, नामदेव ढाके, सदाशिव खाडे, राजेश पिल्ले, राजू दुर्गे, मोरेश्वर शेंडगे, योगेश बाबर आदी उपस्थित होते.

कलारंग संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व आयोजक अमित गोरखे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. भाऊसाहेब कोकाटे यांनी सूत्रसंचालन केले.

### ...म्हणून, लोकांनी नरेंद्र मोदींना निवडलं

**मोदी मुख्यमंत्री असताना त्यांना मिळालेल्या भेटवस्तू विक्रीतून ३०० कोटी मिळाले. ते मुलींच्या शौचालयासाठी दिले. दुसरे मुख्यमंत्री स्वत:साठी सरकारचे ३०० कोटी खर्च करतात. हा फरक पाहून लोकांनी नरेंद्र मोदींना पंतप्रधान म्हणून निवडलं. कोट्यवधी लोकांना घरे दिली. विमा योजना, आयुष्यमान भारतसारख्या योजना दिल्या. प्रत्येक गोष्टीतून दलाली काढून टाकण्याचे काम केले. राष्ट्रीय शिक्षण धोरण आणून प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून देण्याचा निश्चय केला. दलाली बंद करून थेट लोकांपर्यंत, गरिबांपर्यंत, प्रत्येक घटकापर्यंत मदत पोहचविण्याचे काम ते करत आहे.**

---

# भंगारवाल्याकडून पैसे घेतल्याने ३ पोलीस कर्मचारी निलंबित

## पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तांची कारवाई

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पकडलेल्या भंगाराच्या गाडीवर कायदेशीर कारवाई न करता पैसे घेऊन गाडी सोडणाऱ्या ३ पोलीस कर्मचाऱ्यांना पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी निलंबित केले आहे. शुक्रवारी (दि.४) रात्री उशीरा तीन पोलीस कर्मचाऱ्यांच्या निलंबनाचे आदेश काढण्यात आले. हा प्रकार एक महिन्यापूर्वी घडला असून निलंबित तिन्ही पोलीस कर्मचारी हिंजवडी पोलीस ठाण्यात कार्यरत होते.

ज्योतिराम झेंडे, विलास बोऱ्हाडे, अशोक घुगे असे निलंबित करण्यात आलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची नावे आहेत. एक महिन्यापूर्वी तिघांनी भंगाराची गाडी पकडली होती. या गाडीवर कायदेशीर कारवाई न करता पैसे घेऊन गाडी सोडून दिली होती. पोलिसांनी कारवाई न करता पैसे घेऊन गाडी सोडल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलीस आयुक्तांनी तिघांना निलंबित केले. पोलीस आयुक्तांच्या या कारवाईमुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

ज्योतिराम झेंडे, विलास बोऱ्हाडे, अशोक घुगे यांनी गंभीर स्वरुपाच्या गैरवर्तणूक प्रकरणी शिस्तभंग केला आहे. त्यामुळे त्यांना निलंबित करण्यात येत आहे, असे पोलीस आयुक्तांनी आदेशात नमूद केले आहे.



## संपादकीय

# पृथ्वीविज्ञानाचे वाढते मोल

***पुढील काळात संशोधनाचा कल वेगवेगळ्या सेन्सर्सद्वारे खडक, माती, पाणी इत्यादींची केवळ उपलब्धताच नव्हे, तर भौतिक आणि रासायनिक गुणधर्मांच्या नोंदी, नकाशे व तक्त्यांच्या सहाय्याने आकडेवारीचे पृथ:करण आणि त्यातून निष्कर्ष काढणे याकडे राहील. त्यासाठी संगणकच नव्हे तर मोबाईल किंवा तत्सम यंत्रीही पुरे होईल.***

कृत्रिम बुद्धिधारक आभासी मानव करण्याचीही चाहूल लागली आहे.बिगबँग नामक महास्फोटातून निर्माण झालेल्या अथांग विश्वाच्या रचनेतील मोहमयी पृथ्वीचे वय तब्बल साडेचार अब्ज वर्षे! या दीर्घ कालखंडात पृथ्वीवरील खडक-मातीने बनलेल्या शिलावरणाचे स्वरूप बदलत गेले, त्याचबरोबर त्याला लपटलेल्या वातावरण आणि जलावरणाचेही! सागरतळ विस्तारण्याच्या प्रक्रियेतून खंड दुरावत गेले. भूकंप, त्सुनामी, ज्वालामुखीच्या उद्रेकातून आणि खडकांची झीज होण्यातून भूरुपे बदलत गेली. या नैसर्गिक आपत्तींमध्ये भर पडत गेली, केवळ साठ हजार वर्षांपूर्वी अस्तित्वात आलेल्या मानवाच्या करणीची आणि त्यातून होणाऱ्या पर्यावरणाच्या अपरिमित हानीची!

विसाव्या शतकाच्या मध्यावर मानवाने साधलेली प्रगती संथ गतीने, निसर्ग नियमांना धरून होती. मात्र आज लोकसंख्येच्या विस्फोटात, औद्योगीकरण- शहरीकरण- व्यवसायिकरणाच्या रेट्यात जेसीबी, बुलडोझर, टनेल मेकिंग अशा तंत्रज्ञानाधिष्ठित यंत्रांच्या सहाय्याने शिलावरणाचे लचके तोडले जात आहेत. भूमातेच्या पृष्ठावर, उदरात आणि सभोवताली उपलब्ध असलेल्या प्रत्येक घटकावर- खडक, मृदा, वाळू, इंधन, खनिजे, धातू, जल आणि वायुवर- ताबा मिळविण्याची मानवी वृत्ती बळावत जात आहे. त्यात भर पडणार जल, वायू आणि मृदा प्रदूषणाची. त्यातून त्यांची उपलब्धता कमी होत जाणार आणि शेताच्या बांधापासून ते देशांच्या सीमांपर्यंत संघर्ष आणि त्यातून सभोवतालच्या आवरणांवर ताबा मिळविण्याची वृत्ती बळावणार. त्यातून सौर ऊर्जा पॅनल्स, पवनचक्या, अणुऊर्जा क्षेपणास्त्रे, सागरी खारे पाणी गोडे करण्याचे प्रकल्प ठिकठिकाणी आकार घेणार. त्याचबरोबर "टुडेज वेस्ट इज टुमॉरोज रिसोर्स' ही संकल्पना विकसित होत पुनर्वापरावरही मानवाचे लक्ष केंद्रित होणार. कुतुहलाचा वेध घेणे ही मानवी प्रवृत्ती.

एकेकाळी अशक्य वाटणारे मानवाचे पाऊल चंद्रावर पडले.

# सुवर्णमध्य कसा साधेल?




एकेकाळी मध्यमवर्ग हा समाजामध्ये मूल्ये जपणारा वर्ग म्हणून ओळखला जायचा. आता मात्र ही ओळखही पुसली जात आहे की काय, अशी स्थिती येते आहे. उत्पन्न वाढविण्याच्या नादात सामाजिक आणि कौटुंबिक मूल्यांना मूठमाती दिली जात आहे की काय, असे चित्र आहे. समाजाला या दोन्हींचा सुवर्णमध्य गाठण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावे लागतील. अन्यथा, पैसे असणाऱ्यांचा मुर्दाड समाज या स्थितीकडे आपण वेगाने प्रवास करू...

गेल्या वीस वर्षांत भारतातील मध्यमवर्गीयांची संख्या दुप्पट झाल्याची बातमी याच आठवड्यात आली. दरवर्षी मिळणाऱ्या कौटुंबिक आकडेवारीवर ही संख्या ठरते. वीस वर्षांपूर्वी म्हणजे सन २००४ मध्ये भारतात पाच ते तीस लाख रुपये वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांची संख्या १४ टक्के होती. आता ती ३१ टक्के झाली आहे. दुपटीहून थोडी अधिकच वाढ आहे ही. त्याचबरोबर अजून २५ वर्षांनी म्हणजे स्वातंत्र्याच्या शताब्दीत भारतामध्ये सुमारे ६३ टक्के कुटुंबे मध्यमवर्गात मोडतील, असा अंदाज आहे. सरासरी सव्वा लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी उत्पन्न असलेले गरीब गटात, सव्वा ते पाच लाख रुपयांच्यामध्ये उत्पन्न असणारे कनिष्ठ मध्यमवर्गीय, पाच ते तीस लाख रुपये उत्पन्न असणारे मध्यमवर्गीय आणि तीस लाखांपेक्षा अधिक उत्पन्न असणारे हे श्रीमंत वर्गात मोजले जातात. त्याच्याबरोबर जाहीर झालेले इतर निष्कर्षही बरेच काही सांगतात. गेल्या २६ वर्षांत अतिश्रीमंतांच्या संख्येत अठरापट वाढ झाली. त्या तुलनेत मध्यमवर्गीयांमधील वाढ कमी आहे. श्रीमंत आणि अतिश्रीमंतांची संख्या सर्वाधिक असलेले राज्य आहे ते म्हणजे महाराष्ट्र. सुमारे साडेसहा लाख श्रीमंत लोक महाराष्ट्रात राहतात. त्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न हे दोन कोटी रुपयांच्या वर आहे. दिल्लीत एक लाख ८० हजार तर गुजरातमध्ये एक लाख ४१ हजार अतिश्रीमंत राहतात. या अतिश्रीमंतांची संख्या वाढणाऱ्या शहरांत सुरत आणि नागपूर ही दोन आघाडीची शहरे आहेत. ही आकडेवारी नोंदवितानाच त्यांच्या सवयींची आकडेवारीही नोंदविली गेली आहे. त्यानुसार,



३० लाख रुपये उत्पन्न असणाऱ्यांकडे प्रत्येक घरात मोटार आणि वातानुकूलन यंत्रणा आहेच. उच्च मध्यमवर्गीयांपैकी तीस टक्के जणांकडे मोटारी आहेत. भारताने आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्यानंतर मोठ्या प्रमाणात मध्यमवर्गामध्ये झालेली वाढ आता स्पष्ट दिसू लागली आहे. अर्थात, ही सगळी आकडेवारी ही ढोबळमानाने व कर भरणाऱ्यांच्या किंवा आपले उत्पन्न काही ना काही कारणाने जाहीर करणाऱ्यांच्या आकडेवारीवरून तयार केलेली आहे. त्यामध्ये मोठे उत्पन्न मिळविणाऱ्या पण करप्रणालीपासून लपून राहणाऱ्यांचा समावेश नाही. त्याचप्रमाणे खूपच गरीब असल्याने या सर्वच गोष्टींपासून लांब असणाऱ्यांची नोंद त्यामध्ये झालेली नसणार. असे असले तरीही उत्पनामध्ये होत असलेली वाढ ही ठळकपणे नोंदली गेली आहे. आत्ता जे उच्च किंवा मध्यमवर्गीय आहेत; त्यांची ३०-४० वर्षांपूर्वीची स्थिती आपल्यातील बहुतेकांना माहिती आहे. अनेक बाबतीत आपण सगळे सरकारवर अवलंबून होतो. रेशनचे धान्य, रेशनचे कापड याच्याबरोबरच सरकारी शाळेत शिक्षण, शक्यतो सरकारीच नोकरी येथपर्यंतचा तो प्रवास होता. मात्र, नव्या शतकात ते चित्र बदललेले दिसते. आता वर नमूद केलेल्या चारही गोष्टी जवळपास संपुष्टात आल्या आहेत. रेशनवरील धान्य, कापड हे आता मध्यमवर्गीचांच्या नव्या पिढीला माहितीही नाही. इतकेच नव्हे, तर सरकारी शाळेत शिक्षण व सरकारी नोकरीसाठी प्रयत्न हेदेखील त्यांच्या कक्षेबाहेरचे विषय आहेत. गेल्या २५ वर्षांमध्ये झालेला हा ठळक प्रवास आहे.

# शेतकऱ्यासाठी हवा आहे उमेदीचा पेरा..

**अतिवृष्टी, गारपीट, चक्रीवादळ असे जागतिक तापमानवाढीचे परिणाम जगभर दिसायला लागले आहेत. या आसमानी संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्याला सुलतानी अराजकालाही तोंड द्यावं लागतं आहे.**

अतिवृष्टी, गारपीट, चक्रीवादळ असे जागतिक तापमानवाढीचे परिणाम जगभर दिसायला लागले आहेत. या आसमानी संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्याला सुलतानी अराजकालाही तोंड द्यावं लागतं आहे. प्रत्यक्ष मदतीपेक्षा घोषणांची अतिवृष्टीच त्याला गुदमरून टाकते आहे. हे बदलावं लागेल. १३० कोटी एवढी भरभक्कम लोकसंख्या असलेल्या आपल्या देशाचं पोट भरायचं असेल, तर आधी शेतकऱ्याला उमेद देणं गरजेचं आहे.

सत्तावीस वजा नऊ किती, असं विचारलं तर शेतकरी उत्तर देतात शून्य. एकूण नक्षत्रं २७ असतात, त्यापैकी पावसाची नक्षत्रं फक्त नऊ असतात. त्यामुळे शेतकऱ्यांना अन्य नक्षत्रांशी काही देणंघेणं नसतं. पण, आता २७ पैकी २७ नक्षत्रांत पाऊस पडतो की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा अशी अनुभवाने, आपल्या सोयीने केलेली ऋतूंची विभागणी आता जवळपास



कालबाह्य ठरू लागली आहे. तिन्ही ऋतूंत पाऊस धुमाकूळ घालताना दिसतोय. उन्हाळय़ात वळिवाच्या दमदार पावसावर उन्हाळी मशागती व्हाव्यात. रोहिणीच्या किंवा मृगाच्या संततधारेवर पेरण्या व्हाव्यात. पेरण्या करून शेतकऱ्यांनी आषाढीच्या यात्रेला जावं. माघारी येऊन कोळपणी करावी. पुष्य, आश्लेषाच्या दमदार सरी पडाव्यात. शिवारात माणिक-मोत्यांची रास लागावी अन् दिवाळीपूर्वी शेतीमालाने भरलेल्या पोत्यांची घरात थप्पी लागावी, अशी कधीकाळची वैभवशाली शेती आता राहिली नाही. वर्षभर पाऊस पडतोय. कधी चक्रीवादळ, कधी गारपीट तर कधी अतिवृष्टी होतेय. आभाळ फाटलंय, ठिगळ लावायचं कुठं, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडलाय.

जागतिक तापमानवाढीचा परिणाम सन २००० नंतर हळूहळू जाणवू लागला. मागील चार-पाच वर्षांपासून त्याच्या विपरीत परिणामांचा सामना भारतासह जगातील सर्वच देशांना करावा लागत आहे. परदु:ख शीतल, या म्हणीप्रमाणे जगाचं दु:ख बाजूला ठेवून आपण आपल्यापुरतं पाहू.. महाराष्ट्राचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३०७.५८ लाख हेक्टर आहे. त्यापैकी पेरणी योग्य क्षेत्र १६६.५० लाख हेक्टर आहे. त्यातील खरीप पिकांचे क्षेत्र १५१.३३ लाख तर रब्बीचे क्षेत्र ५१.२० लाख हेक्टर आहे. उन्हाळी पिकांखालील क्षेत्र जेमतेम दोन लाख हेक्टर आहे. म्हणजे राज्यात खरिपाची पेरणी सरासरी १५१.३३ लाख हेक्टर आहे. यापैकी जवळपास ४० लाख हेक्टरवर पावसामुळे दाणादाण उडाली आहे. जून ते ऑगस्ट महिन्यांत अतिवृष्टी, पुराचा ३२ जिल्ह्यांना फटका बसला, त्यामुळे २६ लाख हेक्टरवरील पिके नष्ट झाली. जुलै ते ऑगस्ट दरम्यानच्या संततधार पावसामुळे अन्य नऊ जिल्ह्यांतील साडेपाच लाख हेक्टरवरील पिके पाण्याखाली गेली.

## ।। अभंगवाणी ।।




तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ।।१।।
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ।।ध्रु.।।

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### आजारपणामुळे फक्त चार मिनिटं बोलले पवार



।शिर्डी। महाईन्यूज।

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने शिर्डी येथे मंथन शिबिराचं आयोजन करण्यात आलेलं आहे. शरद पवार यांनी आजारी असतांनासुद्धा या शिबिराला हजेरी लावली. पवार फक्त चारच मिनिटं बोलले. त्यांचं उर्वरित भाषण दिलीप वळसे पाटील यांनी वाचून दाखवलं. यावेळी बोलतांना शरद पवार म्हणाले की, उपचारानंतर दहा ते पंधरा दिवसांमध्ये मी पुन्हा नियमित कामाला लागणार आहे. सध्या तब्येत ठीक नाही. त्यामुळे जास्त बोलू शकत नाही, असं पवार म्हणाले. यावेळी त्यांचा आवाज खोल गेल्याचं जाणवलं. यानंतर दिलीप वळसे पाटील यांनी शरद पवार यांचं भाषण वाचून दाखवलं. यामध्ये शरद पवार यांच्या सुरुवातीच्या काळापासूनच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला.

# "उद्धव ठाकरेंचा बदला घेतला!"

## देवेंद्र फडणवीसांचं सत्तास्थापनेबाबत मोठं विधान

।मुंबई।महाईन्यूज।

२०१९ च्या विधानसभेला पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह यांनी ही निवडणूक माझ्या नेतृत्वाखाली लढवणार असल्याचं जाहीर केलं. शिवसेना आणि भाजपाने मिळून मला मुख्यमंत्रीपदाचा चेहरा घोषित केलं होतं. पण, शिवसेनेला अडीच वर्ष मुख्यमंत्रीपद देण्याबाबत ठरलं नव्हते. उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्रीदाची मागणी ठेवल्यावर आम्ही याला स्पष्ट नकार दिला होता. त्यानंतर पालघरची जागा आणि जास्तीची मंत्रालयं देण्याचं शिवसेनेला सांगितलं होतं, असे स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे. ते 'इंडिया टुडे'च्या एका कार्यक्रमात बोलत होते.



"मात्र, शिवसेनेने आमच्याबरोबर गद्दारी केली. माझ्या, भाजपाच्या पाठीत उद्धव ठाकरेंनी खंजीर खुपसला होता. तेव्हापासून आम्ही वाट पाहत होतो. उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरेंच्या व्यवहारामुळे एकनाथ शिंदेंनी बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. आम्हाला याची माहिती मिळाल्यानंतर उद्धव ठाकरेंबरोबर परत जावा, असे थोडी सांगणार. तेव्हा, एकनाथ शिंदेंना म्हणालो बरं झालं आपण बाहेर पडला. आम्ही तुमच्याबरोबर असू. माझ्याबरोबर जी गद्दारी झाली, त्याचा आम्ही बदला घेतला," असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

### "तेव्हा तुम्ही सत्तेसाठी हपापलेले..."

"महाराष्ट्रात सत्तेत येण्यासाठी सत्तापरिवर्तन करण्यात आलं नाही. तर, मागील अडीच वर्षात राज्यात ज्या प्रकारे घटना घडल्या, त्यामुळे सत्तापरिवर्तनाचा निर्णय आम्ही घेतला. पण, तुम्ही मुख्यमंत्रीपदी राहता आणि नंतर दुसऱ्या सरकारमध्ये सहभागी होता, तेव्हा तुम्ही सत्तेसाठी हपापलेले आहात, असा त्याचा अर्थ होतो. त्यामुळे मी सरकारमध्ये सहभागी न होण्याचा निर्णय घेतला होता," असे सुद्धा फडणवीस म्हणाले.

### "त्यामुळे मी सरकारमध्ये..."

"वरिष्ठांनी सांगितले की, तुम्ही राज्यातील महत्त्वाचे नेते आहात. यापूर्वी, तुम्ही मुख्यमंत्री राहिला असून, सरकार चालवण्यासाठी तुमच्या अनुभवाची आवश्यकता आहे. त्यामुळे मी सरकारमध्ये सहभागी होणाचा निर्णय घेतला," असेही देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

## भविष्यात कोणतेही गट एकत्र येऊ शकतात; शिंदे गटाचा भाजपला सूचक इशारा?

**मुंबई** - सध्या कोणत्या पक्षातील नेते दुसऱ्या कोणत्या पक्षात जातील याचा काही नेम उरला नाही. शिवसेनेतून बाहेर पडून शिंदे गटाने सरकार स्थापन केलं. त्यामुळे एकनाथ शिंदे गट आणि उद्धव ठाकरे



असे दोन गट पडले आहे. या दोन्ही गटांनी पूर्वीचा शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्ह गोठवल्यानंतर नवीन पक्ष स्थापन केले आहे. आता मंत्री गुलाबराव पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस आणि एकनाथ शिंदे गट एकत्र येण्याबाबत मोठं विधान केलं आहे. याआधी एकनाथ शिंदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार यांची भेट घेतल्यानंतर सूचक विधान केलं होतं. त्यात त्यांनी भविष्यात शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येऊ शकतात, असं म्हटलं होतं. आता पाटील यांनी एकत्र येण्याबाबत सुचक वक्तव्य करून भाजपला इशारा दिलाय का, अशा चर्चा सुरू झाल्या आहेत.

एकनाथ शिंदे गट आणि उद्धव ठाकरे गट एकत्र येणार का, असा प्रश्न पाटील यांना विचारण्यात आला.

## "सावित्रीबाई फुले मोठं कुंकू लावायच्या, मग त्यांच्यावर शेण, चिखल का फेकण्यात आला?"

### संभाजी भिडेंच्या वादग्रस्त विधानाचा भुजबळांनी घेतला समाचार

।मुंबई।महाईन्यूज।

एका महिला पत्रकारने प्रश्न विचारल्यानंतर प्रश्नाचे उत्तर देण्याऐवजी शिवप्रतिष्ठानचे संभाजी भिडे यांनी 'कुंकू लाव, मगच तुझ्याशी बोलतो' असे वादग्रस्त विधान केले. भिडे यांच्या या विधानानंतर वेगवेगळ्या राजकीय प्रतिक्रिया उमटल्या. भिडे यांच्या या विधानाची दखल थेट राज्य महिला आयोगाने घेतली. महिला आयोगाकडून त्यांना नोटीस पाठवण्यात आली आहे. तर राष्ट्रवादी, काँग्रेससारख्या पक्षांनी भिडे यांच्या या वक्तव्याचा निषेध केला आहे. असे असतानाच आता राष्ट्रवादी पक्षाचे नेते छगन भुजबळ यांनी संभाजी भिडे यांच्या या वक्तव्यावर भाष्य केले आहे. सावित्रीबाई फुले कपाळावर मोठे कुंकू लावायच्या. मग त्यांच्यावर शेण, चिखल का फेकण्यात आला? असा

### संभाजी भिडे काय म्हणाले?

**संभाजी भिडे ३ नोव्हेंबर रोजी मंत्रालयात मुख्यमंत्र्यांच्या भेटीला आले होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. दरम्यान, एका महिला पत्रकाराने त्यांना मुख्यमंत्र्यांच्या भेटीबाबत प्रश्न विचारला असता, "तू आधी कुंकू किंवा टिकली लाव, तरच तुझ्याशी बोलेन. प्रत्येक स्त्री ही भारतमातेचं रुप आहे. भारत माता विधवा नाही", असे वादग्रस्त विधान केले होते. भिडे यांच्या या विधानानंतर राज्यातील महिला नेत्यांसह अनेकांनी निषेध व्यक्त केला.**



सवाल त्यांनी केले. ते शिर्डीत राष्ट्रवादीच्या अधिवेशनात बोलत होते. "मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शेतात शेती करत होते. माध्यमांनी ते दाखवलं. मला वाटलं की मनोहर भिडे हे तुमच्या शेतामध्ये माझ्या अंब्याची झाडे लावा, असे सांगायला शिंदे यांच्याकडे गेले असतील. मात्र भिडे मुख्यमंत्र्यांना भेटून काय बोलले हे विचारावे लागेल. या (मनोहर भिडे यांचे कुंकू लाव विधान) लहान लहान गोष्टी नाहीयेत. या गोष्टी मुद्दाम घडवून आणल्या जातात. मला त्यांना विचारायचे आहे की, सावित्रीबाई फुले फार मोठं कुंकू लावायच्या. सावित्रीबाई यांच्या कपाळावर मोठे कुंकू होते. मग त्यांना का दगड मारले. त्यांच्यावर चिखलफेक का झाली. त्यांच्या कपाळावर मोठं कुंकू होतं ना?" असा सवाल छगन भुजबळ यांनी केला.

## "नारायण राणेंना आपुलकीचा सल्ला, अजित पवारांचा नाद करू नका!",

।मुंबई।महाईन्यूज।

केंद्रीय मंत्री नारायण राणे आणि ठाकरे गटाचे खासदार विनायक राऊत यांच्यात एका बैठकीदरम्यान खडाजंगी झाल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यावेळी दोन्ही नेते एकमेकांवर सडकून टीका करत असल्याचं दिसून आलं. नारायण राणेंनी सिंधुदुर्ग जिल्हा नियोजन समितीच्या या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना विनायक राऊत यांच्यासोबतच विधानसभा विरोधी पक्षनेते अजित पवार यांनाही लक्ष्य केलं होतं. या पार्श्वभूमीवर आता राष्ट्रवादी काँग्रेसकडून नारायण राणेंना खोचक सल्ला देण्यात आला आहे.

शुक्रवारी झालेल्या या बैठकीनंतर नारायण राणेंनी प्रसारमाध्यमांशी बोलताना टीका



### राष्ट्रवादीचा खोचक टोला!

केली होती. "कोणता विषय कधी घ्यावा, हे विनायक राऊत यांना समजत नाही. हे त्यांचे अज्ञान आहे. मी असताना विनायक राऊत सुरवात करू शकतात का?" असं नारायण राणे यावेळी म्हणाले. "अजित पवार यांनी थापा मारण्याचे काम मीडियासमोर केले असून ते आपण ऐकलं आहे. त्यासाठी विशेष पत्रकार परिषद घेऊ", असंही राणे यावेळी म्हणाले.

दरम्यान, यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रवक्ते रविकांत वरपे यांनी नारायण राणेंना खोचक टोला लगावतानाच सल्लाही दिला आहे. "अजित पवार थापा मारतात – नारायण राणे.. राणेसाहेब, एक आपुलकीचा सल्ला! बाकीच्यांचे ठीक आहे पण अजितदादांचा नाद करू नका", असं ट्वीटमध्ये वरपे म्हणाले आहेत.

"अजितदादा थापा मारतात की काय करतात ते एकदा देवेंद्र फडणवीस, हर्षवर्धन पाटील, पडळकर वगैरेंना विचारून घ्या", असा टोलाही वरपे यांनी लगावला आहे.

# नागरिकांकडून राष्ट्रगीताइतकाच 'वंदे मातरम'चाही सन्मान अपेक्षित!

## केंद्र सरकारचे दिल्ली उच्च न्यायालयात निवेदन

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

राष्ट्रगीत जन गण मन आणि राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्' या दोन्ही गीतांबाबत नागरिकांनी समान आदर दाखवला पाहिजे, असे निवेदन केंद्र सरकारकडून दिल्ली उच्च न्यायालयाला केले. केंद्राने म्हटले आहे, की राष्ट्रगीताप्रमाणे 'वंदे मातरम्'चे गायन-वादनासंदर्भात कोणतीही दंडनीय तरतूद किंवा अधिकृत सूचना नाही. परंतु 'वंदे मातरम्'चे भारतीयांसाठी अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यांच्या मनात या गीताला विशेष भावनिक स्थान आहे. या गीताबाबत उच्च



आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे पालन केले जात आहे. 'वंदे मातरम्'ला राष्ट्रगीताइतकाच सन्मान आणि समान दर्जा मिळावा यासाठी वकील अश्विनीकुमार उपाध्याय यांनी केलेल्या जनहित याचिकेच्या उत्तरादाखल सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रासह हे निवेदन गृह मंत्रालयाने न्यायालयाला दिले आहे.

राष्ट्रगीत आणि राष्ट्रीय गीत या दोघांनाही स्वत:चे पावित्र्य आहे. ते समान आदरास पात्र आहेत, यावर भर देऊन केंद्राने सांगितले की, हा विषय निर्देश किंवा मनाई हुकूमासाठी 'रिट याचिके'चा विषय असू शकत नाही. 'जन गण मन' आणि 'वंदे मातरम्' हे दोन्ही समान स्तरावर आहेत आणि प्रत्येक नागरिकाने दोघांचा समान आदर केला पाहिजे. भारतातील लोकांच्या भावना आणि मानसिकतेत राष्ट्रीय गीताला एक अनन्यसाधारण आणि विशेष स्थान आहे, असे लघु प्रतिज्ञापत्र केंद्र सरकारचे वकील मनीष मोहन यांनी दाखल केले.

### 'वंदे मातरम्' आदरास पात्र : उच्च न्यायालय

दिल्ली उच्च न्यायालयात केंद्रातर्फे सांगण्यात आले, की 'वंदे मातरम्'चा मुद्दा सर्वोच्च न्यायालयासमोर आला होता. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने याबाबत कोणत्याही वादात पडण्यास नकार दिला. कारण राज्यघटनेत राष्ट्रीय गीताचा कोणताही संदर्भ नाही. त्यानंतर उच्च न्यायालयाने 'वंदे मातरम्'साठी मार्गदर्शक तत्त्वांची मागणी करणारी आणखी एक याचिका फेटाळल्याचे नमूद करून हे गाणे आदरास पात्र आहे. त्याबाबत वाद-दुमत असू शकत नाही, असे सांगितले.

# युद्धपातळीवर उपाययोजना

## प्राथमिक शाळा बंद, 50 सरकारी कर्मचाऱ्यांचे घरून काम

।नवी दिल्ली।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

दिल्लीच्या हवेतील 'अतिघातक' प्रदूषणामुळे दिल्ली सरकारला युद्धपातळीवर उपाययोजना कराव्या लागल्या असून शनिवारपासून प्राथमिक शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच, दिल्लीच्या सरकारी कार्यालयातील ५० टक्के कर्मचाऱ्यांवर घरून काम करण्याची सक्ती केली आहे. गेल्या चार दिवसांपासून दिल्ली काळवंडली असली तरी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना सुट्टी न दिल्याबद्दल मात्र नागरिक आश्चर्य व्यक्त करत आहेत. दिल्लीसह राजधानी परिक्षेत्रातील नोएडा आदी भागांमध्ये शाळा बंद करून अभ्यासवर्ग ऑनलाइन सुरू करण्यावर गांभीर्याने विचार केला जात होता. दिल्लीतील हवेची गुणवत्तेचा स्तर चारशेहून अधिक मात्रेपर्यंत खालावल्याने शुक्रवारी राजकीय आरोप-प्रत्यरोप सुरू झाले. पंजाबमधील शेत जाळण्याचे प्रकार 'आप' सरकारला रोखता न आल्याने दिल्लीतील प्रदूषण वाढल्याचा आरोप केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी केला. या आरोपानंतर, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी पत्रकार परिषद घेऊन, हवेच्या गुणवत्तेत सुधारणा होईपर्यंत प्राथमिक शाळा बंद करण्याची घोषणा केली. दिल्लीचे पर्यावरणमंत्री गोपाल राय यांनीही तातडीच्या उपाययोजना जाहीर केल्या.केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार, दिल्लीच्या हवेतील प्रदूषणाची मात्रा २९ ऑक्टोबर रोजी- ३९७, ३० ऑक्टोबर-३५२, ३१ ऑक्टोबर ३९२, १ नोव्हेंबर- ४२४, २ नोव्हेंबर- ३७६, ३ नोव्हेंबर-४५० आणि ४ नोव्हेंबर-४७० होती. हवेतील प्रदुषणाची मात्रा ४०० पेक्षा जास्त असेल, तर हवेच्या गुणवत्तेचा स्तर 'अतिघातक' ठरतो. दिल्लीत ७ दिवसांमध्ये ३ दिवस हवा 'अतिघातक' होती.



# इम्रान खान यांच्यावरील हल्ल्यानंतरही मोर्चा सुरूच!

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्यावर गुरुवारी झालेल्या जीवघेण्या हल्ल्यानंतरही त्यांनी आपल्या पक्षातर्फे काढलेला मोर्चा पुढे सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या 'तहरीक-ए-इन्साफ पार्टी'ने (पीटीआय) काढलेल्या मोर्चात पंजाब प्रांतात हा हल्ला झाला होता. या वेळी हल्लेखोराने केलेल्या गोळीबारात या मोर्चात ट्रकमधून निघालेल्या सत्तर वर्षीय इम्रान यांच्या पायाला दुखापत झाली आहे. या हल्ल्यात एक मृत्युमुखी पडला असून, सात जण जखमी झाले आहेत. इम्रान यांची प्रकृती आता स्थिर असून त्यांचा धोका टळल्याची माहिती पक्षातर्फे शुक्रवारी देण्यात आली.

पक्षाचे वरिष्ठ नेते फवाद चौधरी यांनी आरोप केला, की हा इम्रान यांच्या हत्येचा हा सुनियोजित कट होता. त्यांच्या हत्येच्या प्रयत्नात सुदैवाने ते थोडक्यात वाचले आहेत.

# भारतालाही मिळणार क्षेपणास्त्र कवच?

## बॅलिस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली चाचणीचे महत्त्व किती?

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

लांब पल्ल्याचे क्षेपणास्त्र आणि विमानांना निष्प्रभ करण्यास सक्षम असलेल्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण (बीएमडी) इंटरसेप्टर क्षेपणास्त्राची पहिली यशस्वी उड्डाण चाचणी भारताची संरक्षण प्रणाली बळकट करण्यास महत्त्वाची ठरणार आहे. संरक्षण संशोधन व विकास संस्थेने (डीआरडीओ) दुसऱ्या टप्प्यात एडी – १ या शत्रूच्या क्षेपणास्त्राचा पाठलाग करून ते नष्ट करणाऱ्या (इंटरसेप्टर) क्षेपणास्त्राची ओडिशाच्या किनारपट्टीवर चाचणी घेतली. यावेळी प्रणालीतील सर्व उपप्रणाली व यंत्रणांनी अपेक्षेनुरूप काम केले. या प्रणालीमुळे देशातील प्रमुख शहरे तसेच महत्त्वाच्या ठिकाणांचा हवाई हल्ल्यांपासून बचाव करण्यात उपयोग होणार आहे.

बॅलिस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली (बीएमडी) म्हणजे काय?

ध्वनीहून अधिक वेगाने (स्वनातीत) अतिशय दूरवरील लक्ष्य भेदण्याचे सामर्थ्य व अण्वस्त्र वाहून नेण्याची क्षमता यामुळे बॅलिस्टिक क्षेपणास्त्र घातक शस्त्र म्हणून ओळखले जाते. आक्रमक कारवाईत कुठल्याही राष्ट्रविरोधात त्याचा वापर होऊ शकतो.

या चिंतेमुळे जगात विविध क्षमतेच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांची स्पर्धा वाढीस लागली. त्याच वेळी या घातक शस्त्रापासून बचाव करण्याच्या दृष्टीने प्रगत राष्ट्रांनी लक्ष केंद्रित केले. यातून विकसित झालेली प्रणाली बॅलिस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली (बीएमडी) होय. अलीकडे ही प्रणाली केवळ बॅलिस्टिक क्षेपणास्त्रच नव्हे, तर इतर प्रकारच्या क्षेपणास्त्रांपासून बचाव करण्यास सक्षम झाल्याचे शस्त्रास्त्र नियंत्रण संघटनेचे निरीक्षण आहे.



### एडी – १ क्षेपणास्त्र नेमके काय आहे?

देशात विकसित झालेले हे इंटरसेप्टर क्षेपणास्त्र आहे. त्याची रचना लांब पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आणि विमानांना निष्प्रभ करण्याच्या दृष्टीने करण्यात आली. पृथ्वीच्या वातावरणात आणि वातावरणाबाहेर जाऊनही ते पाठलाग करू शकते. दोन टप्प्यांतील यंत्रणेद्वारे ते संचालित होते. देशात विकसित केलेली प्रगत नियंत्रण प्रणाली, दिशादर्शन आणि मार्गदर्शन व्यवस्थेमुळे हे क्षेपणास्त्र वायुवेगाने अचूक लक्ष्यभेद करू शकते. उड्डाण चाचणीत रडार, दूरसंचार व विद्युत चुंबकीय निरीक्षण केंद्रांसह अनेक संवेदकांमार्फत माहिती संकलित करण्यात आली.

# देशातील पहिले मतदार नेगी यांचे निधन

## पंतप्रधान मोदींसह मान्यवरांची श्रद्धांजली

।सिमला ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारतातील पहिले मतदार श्याम सरन नेगी यांचे शनिवारी सकाळी त्यांच्या हिमाचल प्रदेशातील किन्नौर येथील निवासस्थानी निधन झाले. ते १०६ वर्षांचे होते. हिमाचल प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीसाठी त्यांनी २ नोव्हेंबर रोजी टपालाद्वारे मतदान केल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली. मतदान करण्याची त्यांची ही ३४ वी वेळ होती.

मंडी जिल्ह्यातील सुंदरनगर येथील एका प्रचारसभेत शनिवारी नेगी यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, की मी सकाळी नवी दिल्लीहून निघालो तेव्हा मला नेगी यांच्या निधनाची माहिती मिळाली. १०६ वर्षांचा ज्येष्ठ मतदार नेगी यांनी त्यांच्या आयुष्यात तीसहून अधिक वेळा मतदान केले होते. काही दिवसांपूर्वी त्यांनी हिमाचल प्रदेश निवडणुकीसाठी टपालाद्वारे मतदान केले होते. त्यांच्या निधनापूर्वी त्यांनी आपले



कर्तव्य बजावले. त्यांची लोकशाहीवर असलेली श्रद्धा तरुणांसाठी प्रेरणादायक ठरेल. त्यांना श्रद्धांजली वाहताना जड अंत:करणाने माझे मस्तक झुकले आहे. मी त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात सहभागी आहे. मुख्यमंत्री जयराम ठाकूर यांनीही 'ट्विटर'वरून नेगी यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. भाजपसह काँग्रेसनेही नेगी यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. काँग्रेसने म्हटले आहे की, स्वतंत्र भारताचे पहिले मतदार श्याम सरन नेगी यांच्या निधनाबद्दल पक्ष शोक व्यक्त करतो, त्यांच्या आत्म्याला शांती लाभो, अशी ईश्वराकडे प्रार्थना. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी 'ट्वीट' केले, की भारताचे पहिले मतदार नेगी यांचे निधन ही एक दु:खद बातमी आहे.

# लांब गेल्यावरच आपल्या लोकांची किंमत कळते..."- सनी

'झिम्मा' चित्रपटाला मिळालेल्या भरघोस यशानंतर 'झिम्मा'ची टीम प्रेक्षकांसाठी आता एक नवीन भेट घेऊन आली आहे. हेमंत ढोमे दिग्दर्शित 'सनी' लवकरच प्रदर्शित होणार असून नुकताच त्याचा जबरदस्त ट्रेलर सोशल मीडियावर झळकला आहे. घरापासून दूर राहिलेल्या प्रत्येकाची ही गोष्ट आहे. विविध भावनांनी भरलेला हा ट्रेलर पाहून प्रेक्षकांना 'सनी'ची कहाणी जाणून घेण्याची उत्सुकता अधिकच वाढली आहे.




ललित प्रभाकर, चिन्मय मांडलेकर, क्षिती जोग, अभिषेक देशमुख, अमेय बर्वे यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाचे लेखन इरावती कर्णिक यांनी केले आहे. क्रेझी फ्यु फिल्म्स, प्लॅनेट मराठी, क्रिएटिव्ह वाईब प्रॉडक्शन प्रस्तुत, चलचित्र कंपनी निर्मित 'सनी'चे अक्षय बर्दापूरकर, क्षिती जोग, विराज गवस, उर्फी काझमी 'सनी'चे निर्माते आहेत. तर संतोष खेर आणि तेजस्विनी पंडित सहनिर्माते आहेत. एकंदर ट्रेलर पाहून लक्षात येते की कूल, बिनधास्त, स्वच्छंदी आयुष्य जगणारा 'सनी' जेव्हा शिक्षणासाठी घरापासून दूर परदेशात जातो, तेव्हा त्याची स्वावलंबी होण्यासाठीची धडपड यात दिसत आहे. सुखवस्तू घरातून आलेल्या 'सनी'ला परदेशातील परिस्थितीशी जुळवून घेताना त्रास होत आहे. अनेक गोष्टींना सामोरे जात असतानाच त्याला घरच्यांचे महत्व कळत आहे. लांब गेल्यावरच जवळचं सापडतं, असाच काहीसा अनुभव 'सनी'ला येत असल्याचे दिसतेय.

'सनी'ने अशी कोणती चूक केली, ज्याची त्याला अशी शिक्षा भोगावी लागत आहे, 'सनी'च्या मनातली तगमग नेमकी कसली आहे, सनी पुन्हा मायदेशी येणार की परदेशातच राहणार, अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आपल्याला १८ नोव्हेंबरला मिळणार आहेत 'सनी' बद्दल दिग्दर्शक हेमंत ढोमे म्हणतात, ". लांब गेल्यावरच काही गोष्टींची किंमत कळते, जाणीव होते आणि याच अनुभवातून माणूस सर्वार्थाने प्रगल्भ होतो. 'सनी'चा अनुभव मी स्वतःही घेतला आहे. मी स्वतः शिक्षणासाठी परदेशात असल्याने ही कथा माझ्याही खूप जवळची आहे.

# एकटेपणातच सुख...', ललित प्रभाकर

मराठी अभिनेता ललित प्रभाकर हा अनेक मुलींचा हार्टथ्रोब आहे हे आपल्या सगळ्यांनाच माहित आहे. अनेक अभिनेत्रींसोबत त्याचं नाव आतापर्यंत जोडलं गेलं आहे. पण रिलेशनशीपमध्ये गुंतणं यात ललितला काही रस नाही हे अनेकदा दिसूनही आलं आहे. असो,आता त्यानं सोशल मीडियावर एक फोटो पोस्ट करत त्याला दिलेल्या कॅप्शनमधून आपल्या मनातल्या भावना जणू समोर आणल्या आहेत. यावर अनेक मराठी कलाकारांनी प्रतिक्रिया नोंदवल्या आहेत.हेही वाचा: 'त्याला पाहिलं



की सईच्या डोळ्यात दिसते चमक?', क्रांती रेडकरनं उघडं केलं सईचं पितळ ललित प्रभाकर हा सध्या त्याच्या आगामी सनी सिनेमामुळे चर्चेत आहे. अर्थात नेहमीप्रमाणेच या सिनेमातला त्याचा लूकही लक्ष वेधून घेत आहे. ललितनं याच सिनेमातील त्याचा एक फोटो पोस्ट करत ALONE IS WHAT I HAVE...ALONE PROTECTS ME...असं कॅप्शन दिलं आहे. या त्याच्या पोस्टवर अनेक चाहत्यांनी प्रतिक्रिया देताना त्याच्या डोळ्यांची प्रशंसा केलेली दिसत आहे. तर अनेकांनी त्याच्या एकटेपणाच्या पोस्टला देखील पाठिंबा दिला आहे. सनी सिनेमाचा दिग्दर्शक हेमंत ढोमेनं तर त्याच्या फोटोला पाहून शेरलॉकची उपमा दिली आहे. खरं तर ललित प्रभाकरच्या सनी सिनेमाची कथाच ही मुळी घरापासून लांब राहणाऱ्या सर्वांची गोष्ट आहे. ललित प्रभाकर म्हणजेच 'सनी' शिक्षणासाठी परदेशात गेल्यावर पाठीमागे काहीतरी सोडून आल्याची त्याला सतत जाणीव होताना सिनेमात दिसणार आहे. असं म्हणतात, लांब गेल्यावरच जवळच सापडतं. असाच काहीसा अनुभव सिनेमात सनीला येताना आपण पाहू. सनीच्या मनात चाललेली ही चलबिचल नेमकी कशासाठी आहे, याचे उत्तर आपल्याला १८ नोव्हेंबरला मिळणार

# कतरिनाच्या चाहत्यांसाठी खुशखबर

चित्रपटाच्या ओटीटी रिलीजच्या तारखेबाबत कोणतीही घोषणा करण्यात आलेली नाही.

गेल्या काही वर्षांपासून हिंदी सिनेसृष्टीमध्ये हॉरर कॉमेडी या शैलीमधल्या चित्रपटांच्या निर्मितीचे प्रमाण वाढले आहे. या चित्रपटांना प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळत असल्यामुळे निर्माते आणि दिग्दर्शक या शैलीकडे वळले आहेत. कार्तिक आर्यनचा 'भूल भुलैया २' हा विनोदी भयपट खूप चालला. या चित्रपटाने १८० कोटी



रुपयांचे बॉक्स ऑफिस कलेक्शन केले. या चित्रपटशैलीतला 'स्त्री' हा चित्रपट सुपरहिट झाला. असाच एक हॉरर कॉमेडी असलेला चित्रपट शुक्रवारी प्रदर्शित झाला. या चित्रपटाचे नाव आहे 'फोन भूत'.

# "अनेक संधी येत होत्या पण..." गायत्री दातार

स्टार प्रवाह वाहिनीवरील सर्वच मालिका लोकप्रिय आहेत. यातील 'सुख म्हणजे नक्की काय असतं' या मालिकेने अल्पावधीतच प्रेक्षकांच्या मनात स्थान निर्माण केलं आहे. सध्या ही मालिका टीआरपीमध्ये पहिल्या क्रमांकावर असल्याचे पाहायला मिळत आहे. या मालिकेत काही दिवसांपूर्वी अभिनेत्री गायत्री दातारची एंट्री झाली. गायत्री ही या मालिकेत रुही कारखानीस हे पात्र साकारताना दिसत आहे. तिच्या या पात्राला प्रेक्षकही चांगला प्रतिसाद देताना दिसत आहे.

'तुला पाहते रे' या मालिकेतून अभिनय क्षेत्रात पदार्पण करणारी अभिनेत्री म्हणून गायत्री दातार हिला ओळखले जाते. तिने या मालिकेत



ईशा ही भूमिका साकारली होती. तिने अभिनयाच्या जोरावर सिनेसृष्टीत तिची वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यानंतर तिने 'चला हवा येऊ द्या' या लोकप्रिय कार्यक्रमात सुद्धा विनोदी भूमिका साकारली होती. त्यानंतर ती 'बिग बॉस मराठी'मध्ये झळकली. यानंतर मात्र गायत्रीने कलाविश्वातून ब्रेक घेतला. नुकतंच तिने यामागचे खरं कारण सांगितले आहे. एका युट्यूब चॅनलला दिलेल्या मुलाखतीत गायत्रीला छोट्या पडद्यावरील न झळकण्यामागचे कारण काय? असा प्रश्न विचारला होता. त्यावर तिने सविस्तरपणे उत्तर दिले. यात ती म्हणाली, "मी पुढे काही काळ मालिका करणार नाही, असे ठरवले होते. त्यावेळी मला अनेक संधीही येत होत्या. मला सातत्याने अनेक मालिकेतील भूमिकांसाठी विचारणाही केली जात होती. मात्र एकदा मालिका सुरू केली की ती खूप वर्ष चालते."

"मला वेगवेगळ्या गोष्टी करून बघायच्या होत्या, म्हणून मी ठरवलं होतं की थोडे दिवस मालिका करायची नाही. पण या मालिकेतील ही संधी मला खूप छान वाटली. यात माझी खूप वर्ष जाणार नाहीत. तसेच, मला आता तेवढी वर्ष वायाही घालावायची नाहीत. यादरम्यान मला अनेक चाहत्यांचे मेसेज येत होते. तू आम्हाला परत मालिकेत कधी दिसणार, तू मालिकेत कधी काम करणार, असे अनेक प्रश्न मला माझे चाहते विचारत होते. त्यामुळे ही मालिका तीन चार महिन्यांसाठी करायला काय हरकत आहे, असा विचार करुन मी यासाठी होकार दिला. ही माझ्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे",

# अनामिका-आकाशचं लग्न होणार? '

झी मराठी वाहिनीवरील 'तू तेव्हा तशी' मालिका सध्या चांगलीच चर्चेत आहे. या मालिकेने सध्या प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतलं आहे. वयाची ३५शी ओलांडलेल्या जोडप्याची कथा या मालिकेमध्ये दाखवण्यात आली आहे. अनामिका-सौरभ या जोडप्याला प्रेक्षकांची पसंती मिळताना दिसत आहे. अनामिकाचा पहिला नवरा आकाशची या मालिकेमध्ये एंट्री झाली आणि मालिकेला नवं वळण मिळालं. आता आणखी एक ट्विस्ट मालिकेमध्ये पाहायला मिळणार आहे. स्वप्निल जोशी आणि शिल्पा तुळसकर या मालिकेमध्ये सौरभ आणि अनामिकाची भूमिका साकारत आहे. अनामिकाला घटस्फोट देण्यासाठी तयार नसलेला तिचा पहिला नवरा आकाश सौरभला गायब करतो. पण या सगळ्या गोंधळामध्ये अनामिका व आकाशच्या लग्नाची चर्चा



पुन्हा एकदा सुरु झाली आहे. झी मराठी वाहिनीने शेअर केलेल्या एका व्हिडीओमध्ये आकाश-अनामिका पुन्हा लग्न करणार का? असा प्रश्न निर्माण होत आहे. आकाश एका व्यक्तीचा चेहरा लपवून त्याला खुर्चीमध्ये बांधून ठेवतो. आणि त्याच्यासमोरच अनामिकाबरोबर सात फेरे घ्यायला सुरुवात करतो.या व्हिडीओमध्ये लग्नाचा मंडप दिसत आहे. रविवारी (६ नोव्हेंबर) प्रदर्शित होणाऱ्या विशेष भागामध्ये अनामिका-आकाशचं लग्न होणार का? सौरभचं पुढे काय होणार? हे दाखवण्यात येणार आहे. प्रेक्षकांना मात्र या मालिकेमध्ये आलेले ट्विस्ट आवडला नसल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मालिकेमध्ये असा ट्विस्ट नको, आम्हाला अनामिका व सौरभचं लग्न पाहायचं आहे असं अनेकांनी म्हटलं आहे.

## शॉर्ट न्यूज »

### वसीम अक्रमने पंचांवर ओढले ताशेरे

।नवी दिल्ली। महाईन्यूज

पाकिस्तानच्या माजी वेगवान गोलंदाजाने सिडनीमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मोहम्मद नवाजला बाद ठरवणे, हे सध्याच्या टी-२० विश्वचषकातील खराब अंपायरिंगचे सर्वात अलीकडील उदाहरण असल्याचे म्हटले आहे. टी-20 विश्वचषकातील पावसाने प्रभावित झालेल्या दुसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ३३ धावांनी मिळवलेल्या विजयाने पाकिस्तानला उपांत्य फेरीच्या शर्यतीत जिवंत ठेवले आहे. नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेताना मोहम्मद नवाज (२८) आणि इफ्तिखार अहमद (३५ चेंडूत ५१) यांनी चौथ्या विकेटसाठी ६२ धावांची भागीदारी केल्याने पाकिस्तानची धावसंख्या ४३/४ अशी झाली होती. तथापि, भागीदारी अत्यंत विचित्र परिस्थितीत समाप्त झाली. तबरेझ शम्सीच्या चेंडूवर स्वीप मारण्याचा प्रयत्न करताना नवाझने त्याच्या बॅटची कड घेऊन चेंडू पॅडवरून उडाला. इथेच पहिल्या पंचांने समजले लेग बिफोर विकेट, त्याच वेळी नवाज त्याच्या क्रीजच्या बाहेर सिंगल शोधत होता, पण इफ्तिखारने नॉन-स्ट्रायकरच्या टोकावरुन त्याला नकार दिला.

### श्रीलंकेमुळे पडली यजमान

# ऑस्ट्रेलियाची विकेट!

## इंग्लंडची उपांत्यफेरीमध्ये धडक!

**ऑस्ट्रेलिया। महाईन्यूज । वृत्तसंस्था**

सिडनी येथे इंग्लंड विरुद्ध श्रीलंका संघात टी-२० विश्वचषक २०२२ स्पर्धेतील ३९ वा सामना पार पडला. या सामन्यात इंग्लंडने श्रीलंकेवर ४ विकेट्सने विजय मिळवला. त्याचबरोबर टी-२० विश्वचषक २०२२ स्पर्धेच्या उपांत्य फेरीत स्थान मिळवणारा दुसरा संघ ठरला. श्रीलंकेने इंग्लंडला १४२ धावांचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात इंग्लंडने १९.४ षटकांत ६ गडी गमावून १४४ धावा केल्या. त्यामुळे ऑस्ट्रेलिया संघाचा उपांत्य फेरीत जाण्याचा पत्ता कट झाला आहे.



इंग्लंडला प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने १४२ धावांचे लक्ष्य दिले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंड संघाकडून जोस बटलर आणि अ‍ॅलेक्स हेल्सने पहिल्या विकेट्साठी शानदार ७१ धावांची भागीदारी रचली. त्यामुळे इथेच इंग्लंड संघाच्या विजयाचा पाय रचला गेला. त्यानंतर जोस बटलर २८ धावा करुन बाद झाला. त्यानंतर अ‍ॅलेक्स हेल्स आणि बेन स्टोक्सने अनुक्रमे ४७ आणि ४२* धावांची भागीदारी केली. हेल्सने इंग्लंडकडून सर्वाधिक धावा करताना ३० चेंडूत ७ चौकार आणि १ षटकार लगावला. या तीन खेळाडूं व्यतिरिक्त इंग्लंडच्या इतर खेळाडूंना आपली छाप पाडता आली नाही. श्रीलंका संघाकडून गोलंदाजी करताना लहिरु कुमारा, वानिंदू हसरंगा आणि धनंजया डी सिल्वा यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. या तिघांनी अनुक्रमे २४, २३ आणि २४ धावा दिल्या.

तत्पुर्वी या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना श्रीलंका संघाने आक्रमक सुरुवात केली होती. परंतु चौथ्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर श्रीलंकेला पहिला धक्का बसला. ख्रिस वोक्सने कुसल मेंडिसला (१८) लियाम लिव्हिंगस्टोनकडे झेलबाद केले. त्यामुळे श्रीलंकेने चार षटकांत एक गडी बाद ३९ धावा केल्या.

त्यानंतर पाथुम निसांकाने संघाचा डाव सावरताना शानदार खेळी साकरली. त्याने ४५ चेंडूत २ चौकार आणि ५ षटकार लगावत ६५ धावा केल्या. त्याची ही खेळी श्रीलंका संघाकडून खेळली गेलेली सर्वोच्च खेळी होती. त्याचबरोबर भानुका राजपक्साने २२ धावांचे योगदाने दिले. त्यामुळे श्रीलंकेला निर्धारित २० षटकांत ८ बाद १४१ धावा केल्या. तसेच इंग्लंड संघाकडून गोलंदाजी करताना, मार्क वुडने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. त्याने ४ षटकांत २६ धावा दिल्या.

# तर उपांत्यफेरीत भारताऐवजी पाकिस्तान ठरणार पात्र!

## रविवारचे तिन्ही सामने भारतासाठी महत्त्वाचे



**अहमदाबाद । महाईन्यूज । वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषकामधील पहिल्या गटातील चित्र पूर्णपणे स्पष्ट झालं आहे. पहिल्या गटामधून न्यूझीलंड आणि इंग्लंडने उपांत्यफेरी गाठली आहे. भारताचा सामावेश असणाऱ्या दुसऱ्या गटातील चित्र उद्या म्हणजेच रविवारी स्पष्ट होणार आहे. उद्या दक्षिण आफ्रिका विरुद्ध नेदरलॅण्ड्स, भारत विरुद्ध झिम्बाब्वे आणि पाकिस्तान विरुद्ध बांगलादेश असे तीन सामने होणार आहे. या सामन्यांपैकी दक्षिण आफ्रिका आणि भारताने आपआपले सामने जिंकले तर पाकिस्तान स्पर्धेतून बाहेर पडेल. भारत झिम्बाब्वेविरुद्ध पराभूत झाला तर मात्र भारताच्या अडचणी वाढतील असं चित्र आहे. दक्षिण आफ्रिका आणि भारताने सामना जिंकला तरी भारत पात्र

विश्वचषक स्पर्धेसाठी आयसीसीने सुपर १२ फेरीमधील सामन्यांसाठी एकही राखीव दिवस ठेवलेला नाही. त्यामुळेच भारत आणि झिम्बाब्वेदरम्यानच्या सामन्याच्या दिवशी पाऊस झाला तर दोन्ही संघांना एक एक गुण वाटून दिला जाईल. म्हणजेच भारताकडे सात गुण होतील आणि भारत उपांत्य फेरीसाठी पात्र ठरले. भारत थेट पात्र ठरेल अशासाठी कारण सध्या दुसऱ्या स्थानी असणाऱ्या दक्षिण आफ्रिकेने आणि तिसऱ्या स्थानी असणाऱ्या पाकिस्तानने आपआपले सामने जिंकले तरी भारत पहिल्या दोन संघामध्ये सात गुणांसहीत जागा निश्चित असेल.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही